


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक-मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com

क्रांतिवीर
बीड जिल्ह्यात तालुका, शहर प्रतिनिधी नेमणे आहेत, इच्छुकानी संपर्क साधावा
मोबा.९४२३९७९४९२


वर्ष १३ वे अंक ३८ वा | सोमवार, दि.११ मे २०२६ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# पेट्रोल-डिझेल महागाईचे संकेत

## पंतप्रधान मोदींचे देशवासियांना आवाहन

## महागाई, बेरोजगारी, इंधनदरांनी होरपळलेल्या जनतेचा भाजप सरकारवर संताप

## सामान्य माणूस रोज मरतोय आणि दिल्ली अजूनही टाळ्या वाजवतेय?



नवी दिल्ली । क्रांतिंवीर प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालच्या भाषणानंतर देशभरात संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, सामान्य नागरिकांकडून भाजप सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पेट्रोल-डिझेल कमी वापरा, खर्चावर नियंत्रण ठेवा, कारपूलिंग करा अशा आवाहनांवर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया देत, जनतेला जगणंच कठीण झालंय आता आणखी काय कमी करायचं? असा सवाल उपस्थित केला आहे.देशात आधीच महागाईने सामान्य माणसाची कंबर मोडली आहे. पेट्रोल-डिझेलचे दर वाढल्याने वाहतूक खर्च वाढला, त्याचा थेट परिणाम अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंवर झाला. गॅस सिलेंडर सामान्य कुटुंबाच्या आवाक्याबाहेर गेला आहे. बेरोजगारीमुळे लाखो तरुण नैराश्यात ढकलले गेले आहेत. छोट्या व्यापाऱ्यांचे व्यवसाय अडचणीत आले आहेत.




अशा परिस्थितीत सरकारकडून दिलासा मिळेल अशी अपेक्षा असताना, पुन्हा एकदा संयम आणि काटकसरचे सल्ले दिले जात असल्याने जनतेमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्धा जिल्ह्यातील काही तरुणांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, आमच्याकडे नोकरी नाही, व्यवसाय नाही, घरखर्च भागत नाही आणि सरकार सांगतं पेट्रोल कमी वापरा, आम्ही फिरायला गाड्या चालवत नाही, जगण्यासाठी बाहेर पडतो.सोशल मीडियावरही कालच्या भाषणानंतर भाजप सरकारविरोधात प्रतिक्रिया वाढल्या. काहींनी लिहिले, जनतेला फक्त त्याग शिकवला जातोय पण सत्ताधाऱ्यांच्या ऐशोआरामावर कोणी बोलणार का? तर काहींनी महागाईवर उत्तर नाही, रोजगारावर योजना नाही, पण भाषण मात्र जगातील सर्वात मोठं अशा शब्दांत रोष व्यक्त केला.विरोधी पक्षांनीही मोदी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. काँग्रेससह अनेक विरोधी नेत्यांनी पेट्रोल-डिझेलवरील कर कमी करण्याची मागणी करत, जनतेच्या खिशावर वार करून नंतर त्यांनाच बचतीचे धडे देणे म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे, अशी टीका केली.राजकीय तज्ज्ञांच्या मते, गेल्या काही वर्षांत राष्ट्रवाद आणि मोठ्या घोषणांच्या जोरावर जनतेचा विश्वास जिंकणाऱ्या भाजपसमोर आता सर्वात मोठं आव्हान म्हणजे महागाई आणि बेरोजगारी आहे. कारण हे प्रश्न आता थेट घराघरात पोहोचले आहेत.

ग्रामीण भागात तर परिस्थिती आणखी गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. शेतकऱ्यांना पिकाला भाव नाही, डिझेल महाग असल्याने शेती खर्च वाढला आहे, तर शहरांमध्ये मध्यमवर्ग ईएमआय, फी, वीजबिल आणि वाढत्या खर्चाखाली दबला गेला आहे.दरम्यान भाजप समर्थकांनी मात्र पंतप्रधानांच्या भूमिकेचे समर्थन करत जागतिक परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या संकटाचा उल्लेख केला आहे. पण संतप्त नागरिकांचा एकच प्रश्न आहे जनतेने किती त्याग करायचा आणि सत्ताधाऱ्यांनी जबाबदारी कधी घ्यायची? देशातील वाढत्या आर्थिक तणावाच्या पार्श्वभूमीवर कालचे भाषण हे प्रेरणादायी ठरले की जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारे, याची चर्चा आता गावागावात रंगू लागली आहे.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी शेतकरी काढणार जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा

## शेतीला हक्काचे पाणी द्या, नदीजोड प्रकल्पाची मागणी



बीड। क्रांतिंवीर प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी द्यावे व गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प तात्काळ करावा यासाठी जिल्ह्यातील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढणार आहेत. लोकलढा आंदोलनच्या मादळमोही येथील बैठकीत शेतकऱ्यांनी हा निर्णय घेतला.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागते. बीड जिल्ह्यात दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडतो तसेच पावसाचे प्रमाणही कमी आहे, यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. महाराष्ट्रात व विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात शेतीसाठी पाण्याच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती जायकवाडी धरणाच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित आहे. शेतीला उन्हाळ्यात पाणी मिळत नसल्याने ऊस, भाजीपाला, फळबागा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यामुळे बीड जिल्ह्यातील शेती सातत्याने तोट्यात जाऊन शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा यासह इतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे व कृष्णा खोऱ्याचे हक्काचे पाणी मिळाले पाहिजे तसेच बीड जिल्ह्यात नदीजोड प्रकल्प प्राधान्याने होणे गरजेचे आहे. त्यासाठी गेल्या दोन वर्षापासून लोकलढा आंदोलन वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करीत आहे. या आंदोलनातील शेतकऱ्यांची बैठक गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान येथे पार पडली. या बैठकीस लोकलढा आंदोलनातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत लोकलढा आंदोलनाचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १६८ टीएमसी चा नदीजोड प्रकल्प करण्यात येत आहे. या प्रकल्पातून बीड जिल्ह्याला किती पाणी देणार तसेच नदीजोड प्रकल्प करण्यासाठी सर्वेक्षण करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली. या मागण्यांसाठी येत्या २५ मे सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकर्यांचा बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद फुलविण्यासाठी शासनाने शेती सिंचनाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी मागणी ही बैठकीत करण्यात आली. या बैठकीसाठी लोकलढा आंदोलनातील ज्येष्ठ व तरुण शेतकरी, समन्वयक उपस्थित होते.

# बीड चे तात्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक जेरबंद !

## सर्वोच्च प्रशासकीय पदालाच डाग?

**भूसंपादन मावेजा प्रकरण अंगलट ; कांबळे नंतर पाठक अटकेत!**

**लातूरमधून एसआयटीची कारवाई; दिवसभर चौकशीनंतर ताब्यात, महसूल विभागात खळबळ**

**बनावट आदेश, खोट्या सह्या आणि वाढीव मोबदल्याच्या नावाखाली कोट्यवधींचा अपहार; 310 कोटींच्या व्यवहारांची चौकशी वेगात**



बीड। क्रांतिंवीर प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एक खळबळजनक माहिती समोर येत आहे. बीड जिल्ह्यातील महसूल घोटाळ्यात एक मोठा मासा गळाला लागला आहे. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळा प्रकरणात अखेर मोठी कारवाई करण्यात आली आहे. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूरमधून अटक केली आहे. या अटकेच्या वृत्ताला पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दुजोरा दिला असून, या कारवाईमुळे संपूर्ण महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे.दिवसभराच्या चौकशीनंतर कारवाई मिळालेल्या माहितीनुसार, अविनाश पाठक यांची या प्रकरणावरून दिवसभर कसून चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर विशेष तपास पथकाने (ङखढ) त्यांना लातूरमधील राहत्या घरातून ताब्यात घेतलं. या घोटाळ्याचा तपास एसआयटीच्या माध्यमातून सुरू असून, आता थेट तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांवरच कारवाई झाल्याने हे प्रकरण गंभीर वळणावर पोहोचलं आहे.

### मोठी नावे समोर येण्याची शक्यता

दरम्यान, या अटकेनंतर बीड जिल्ह्यातील प्रशासन आणि महसूल विभागात मोठी चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एसआयटीकडून या घोटाळ्याचा सखोल तपास सुरू असून, आगामी काळात आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शासनाच्या निधीची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याने या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय


## ‘इंडिया’ची इडा!

नुकत्याच झालेल्या तमिळनाडू, पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालांनंतर राष्ट्रीय राजकारणातील संदर्भ बदलल्याचे दिसत आहेत. विशेषत: ‘इंडिया आघाडी’पासून सुरू झालेली आणि अलीकडेच महिला आरक्षण विधेयकाच्या निमित्ताने संसदेत ठळकपणे दिसलेली विरोधकांच्या ऐक्याची वीण उसवली गेली आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याउलट केंद्रातील सत्ताधारी भाजपला पश्चिम बंगालच्या विजयाने अधिक बळ मिळाले आहे. या निकालांनंतरचे देशाचे राजकीय चित्र पाहता देशातील ७० टक्क्यांपेक्षा अधिक भूभागावर भाजप किंवा मित्र पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली आहे. अशा पद्धतीने देशभर पसरलेल्या भाजपशी सामना करण्यासाठी एकेका राज्यातून एकेकट्याने भाजपच्या विरोधात लढण्यापेक्षा एकत्र येऊन लढण्यासाठी विरोधकांच्या एकीचा मुद्दा नेहमी मांडला जातो. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी विरोधकांनी एकत्र येत ‘इंडिया आघाडी’चा प्रयोग केला. अर्थात, सारेच विरोधक या आघाडीत सहभागी झाले नव्हते. तरीही विरोधकांची मोट बांधण्यात तेव्हा काँग्रेसला बर्यापैकी यश आले होते. ममता बॅनर्जी सहभागी झाल्या नसल्या तरी अगदी आम आदमी पार्टीच्या अरविंद केजरीवाल यांच्यासारखे कट्टर काँग्रेस विरोधकही या आघाडीत सहभागी झाले होते. त्याचा निकालावरही परिणाम झाला. भाजपने सत्ता राखली असली तरी ‘चारसो पार’ची घोषणा दिलेल्या भाजपची गाडी २४० वरच रखडली. विरोधकांच्या एकीमुळेच भाजपला रोखण्यात तेव्हा यश आले होते. अगदी गेल्याच महिन्यात महिला आरक्षणाच्या आणि मतदारसंघ पुनर्रचनेसाठी मांडण्यात आलेले घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत विरोधकांच्या एकीनेच मंजूर होऊ शकले नाही. संसदीय राजकारणात पंतप्रधान मोदी यांचा गेल्या १२ वर्षांतील राजकीय कारकीर्दीतील पहिलाच पराभव. सर्व विरोधक एकत्र आल्याने भाजपला घटना दुरुस्तीसाठी आवश्यक दोन तृतीयांश मतांचे उद्दिष्ट साधता आले नाही. परिणामी भाजपला मोठा धक्का बसला.

विरोधकांची अशीच एकी निवडणुकांमध्ये आणि एरव्ही संसदेतही कायम राहावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करण्यात येत होती. पण तमिळनाडू विधानसभेच्या निकालाने विरोधकांच्या एकीला मोठा धक्का बसला आहे. तिथे चित्रपट अभिनेते विजय यांच्या टीव्हीके पक्षाने अनपेक्षितपणे मुसंडी मारली. पक्षाला बहुमतासाठी १० आमदारांचे संख्याबळ कमी पडले आणि सारे चित्र बदलले. विजयने भाजपच्या कच्छपी लागू नये म्हणून कधी नव्हे एवढ्या चपळाईने काँग्रेसने विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला. पण त्यासाठी काँग्रेसने गेल्या दोन दशकांचा मित्र पक्ष असलेल्या द्रमुकशी आघाडी तोडली. वास्तविक, द्रमुक आणि विजय या दोघांचाही भाजप हा समान शत्रू आहे. भाजप हा वैचारिक विरोधक असल्याचे विजय यांनी प्रचारातच जाहीर केले होते. पण त्यांना पाठिंबा देणे राज्यातील दीर्घकालीन राजकारणासाठी द्रमुकला सोयीचे नव्हते. विजय यांना पाठिंबा देण्याचा काँग्रेसचा निर्णय द्रमुकला आवडला नाही. काँग्रेसने पाठीत खंजीर खुपसल्याची अधिकृत प्रतिक्रिया द्रमुककडून व्यक्त करण्यात आली. त्यातच द्रमुक व अण्णा द्रमुक या पारंपरिक विरोधकांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याच्या दिल्लीतील प्रयत्नांना स्टॅलिन यांनी अनुकूल प्रतिसाद दिला होता. तर तमिळनाडूसारख्या मोठ्या राज्यात भाजपला चंचूप्रवेश मिळू नये म्हणून काँग्रेसने विजय यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसचे हे वागणे द्रमुकला एवढे नापसंत ठरले की त्यांनी ताबडतोब लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून सभागृहात बसण्यासाठी वेगळी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. काँग्रेसच्या या निर्णयामुळे द्रमुकचे २२ खासदार काँग्रेसपासून दुरावले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तमिळनाडूतील सर्व ३९ जागा ‘इंडिया आघाडी’ने जिंकल्या होत्या. पण आता सगळीच गणिते बदलण्याची शक्यता आहे. दुसरीकडे समाजवादी पक्षाच्या अखिलेश यादव यांनीही काँग्रेसने उचललेल्या या पावलाबद्दल सूचक टिप्पणी केली आहे. या सगळ्या घडामोडींचा ‘इंडिया आघाडी’ला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी यांच्या पश्चिम बंगालमधील पराभवाचाही विरोधकांच्या संख्याबळावर परिणाम होऊ शकतो. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूतील लोकसभेच्या एकूण ८१ जागांपैकी ‘इंडिया आघाडी’ आणि ममतांच्या तृणमूल काँग्रेसने एकूण ६९ जागा जिंकल्या होत्या. आगामी लोकसभा निवडणुकीआधी मतदारासंघांची पुनर्रचना होऊन जागांच्या संख्येत वाढ झाली वा सध्याचेच संख्याबळ कायम राहिले तरीही विरोधकांना एवढे यश संपादन करणे आता आव्हानात्मक असेल.

काँग्रेस, ममता बॅनर्जी, आम आदमी पार्टीचे केजरीवाल, समाजवादी पार्टी, द्रमुक या सगळ्या विरोधी पक्षांमध्ये एक समान धागा म्हणजे या सर्वांचा राजकीय विरोधक एकच, भाजप. भाजपशी सामना करण्यासाठी या विरोधकांची एकी राहणे अपेक्षित आहे. पण बदलत्या परिस्थितीत त्यांची मोट बांधणे हे आव्हानात्मक ठरणार आहे. काही तरी होऊन एकत्र आले तरी विरोधकांचे ऐक्य टिकेलच याची खात्री देता येत नाही. इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीनंतर समाजवाद्यांपासून जनसंघापर्यंत टोकाचे विरोधक पक्ष एकत्र आले होते. कारण काँग्रेस हा तेव्हा सगळ्यांचा प्रमुख राजकीय शत्रू होता. एकीचा हा प्रयोग तेव्हा यशस्वी झाला आणि जनता पक्षाला सत्ता मिळाली. ही एकी फार काळ टिकली नाही. जनसंघाच्या नेत्यांच्या दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा मधू लिमये आणि अन्य समाजवादी साथींनी पुढे रेटला. जनता पक्षातील जनसंघाच्या नेत्यांनी रा. स्व. संघाशी असलेले संबंध तोडावेत, अशी मागणी करत जनता पक्षातील नेत्यांनी तेव्हा दबाव आणला होता. शेवटी या दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्द्यावरच जनता पक्षाचे सरकार कोसळले. आताचे चित्रही फार काही वेगळे नाही. काँग्रेसच्या भूमिकेमुळे द्रमुकला वेगळा निर्णय घ्यावा लागला आहे. भाजप विरोधातील लढाईत द्रमुकची भूमिका महत्त्वाची होती. केंद्र– राज्य संबंध, दक्षिणेकडील राज्यांवर होणारा अन्याय, हिंदी सक्तीला विरोध, त्रिभाषा सूत्र, विधेयके रोखून धरण्याच्या कृतीच्या विरोधात थेट राज्यपालांशी पंगा अशा विविध मुद्द्यांवर द्रमुकने भाजपशी सातत्याने दोन हात केले आहेत. द्रमुक, काँग्रेस किंवा विजय यांचा टीव्हीके या तिन्ही पक्षांची खरी लढाई ही खरेतर भाजपशीच आहे. पण हे तिन्ही पक्ष एकत्र येणे कठीण दिसते आहे. आम आदमी पार्टी आधीच ‘इंडिया आघाडीतू’न बाहेर पडली आहे. आता द्रमुकने काँग्रेसपासून अंतर राखण्याचा निर्णय घेतला आहे. उद्या आणखी पक्षदेखील ‘इंडिया आघाडी’तून बाहेर पडू शकतात.

# तत्वनिष्ठ शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील !



रयत हा शब्द मराठी संस्कृतीच्या जिव्हाळ्याचा शब्द आहे. मूळ अरबी भाषेतील असणाऱ्या शब्दाने मराठी भाषिकांना आकर्षित केले आहे. रयत म्हटले की एक आपुलकीची भावना मराठी भाषिकांच्या मनात निर्माण होते. कारण छत्रपती शिवाजीराजांनी जे राज्य निर्माण केले, त्या राज्याला रयतेचे राज्य असे म्हटले जाते. रयत म्हणजे सर्व जनता! त्यामध्ये भेदभाव नाही. छत्रपती शिवाजीराजांनी कृषी, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये समतेचा पाया घातला. तीच परंपरा शैक्षणिक क्षेत्रामध्ये १९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून कर्मवीर भाऊराव पाटलांनी सुरू ठेवली.

कर्मवीर भाऊराव पाटील हे शैक्षणिक क्षेत्रातील रयतेचे तत्वनिष्ठ शिक्षणमहर्षी आहेत. कर्मवीरांचे कार्य हे सर्व जाती–धर्मांसाठी होते. रयतेच्या शिक्षणाची माऊली म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील होत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी छत्रपति शाहूजी महाराज यांच्या कार्याचा वारसा शैक्षणिक क्षेत्रामध्ये कर्मवीर आण्णांनी उभारला. ते सत्यशोधकी होते. शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक सदस्य होते. ते अत्यंत मानवतावादी होते.

कर्मवीरांनी शिक्षण संस्था उभारून पैसा कमावला नाही, परंतु स्वतःच्या कमाईचा सर्व पैसा रयतेच्या शिक्षणासाठी खर्च केला. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईंनी मंगळसूत्रासह सर्व दागिने गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी मोडले. म्हणूनच आण्णाना शिक्षणमहर्षी म्हटले जाते. त्यांचे संत गाडगेबाबा, प्रबोधनकार ठाकरे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रातिसिंह नाना पाटील यांचेशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

आण्णा हे सामान्य शेतकरी कुटुंबातून आले होते. त्यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या आजोळी गावी झाला. त्यांचे गाव वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक होय. वडील सरकारी सेवेत असल्यामुळे बदलीच्या गावी विटा, दहिवडी, इस्लामपूर इत्यादी ठिकाणी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण झाले. त्यांच्या वडिलांना बाणेदारपणामुळे नोकरी सोडावी लागली. आण्णांचे पुढील शिक्षण कोल्हापुरातील जैन बोर्डिंगमध्ये झाले. बोर्डिंगचे नियम मोडल्यामुळे त्यांना अधीक्षकांनी काढून टाकले, तेंव्हा शाहू महाराजानी त्यांना राजवाड्यावर ठेवून घेतले व राजपुत्रांबरोबर शिकविले.आण्णा बालवयापासूनच बंडखोर होते, अस्पृश्याना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू दिले नाही, म्हणून त्यांनी रहाटच मोडून टाकला. ज्ञानदेव घोलप या मुलाला घेऊन त्यांनी परिवर्तनाचा लढा सुरू केला. ज्ञानदेव घोलप या मुलाला जेंव्हा ते घरी जेवायला घेऊन गेले, तेंव्हा आई आण्णांवर रागावली तरी आण्णा दुसऱ्या दिवशीदेखील त्याला आणखीन घरी जेवायला घेवून गेलेच.परिवर्तन करण्यासाठी आण्णा नेहमी हट्टी असायचे. सत्यशोधक चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर या ठिकाणी स्थापन केलेल्या जैन बोर्डिंगमध्ये आण्णा शिक्षणासाठी गेले. तेथे शिक्षण घेत असताना आण्णांनी जैन बोर्डिंगचे कर्मठ नियम मोडले. तेव्हा तेथील अधीक्षकांनी आण्णांना वस्तीगृहातून काढून टाकले. पण आण्णा निराश होणारे नव्हते, तर सतत धडपडत राहणे हा त्यांचा स्थायीभाव होता. खानविलकर नावाचे आण्णांचे मित्र आण्णांना घेऊन शाहू महाराजांकडे राजवाड्यावरती गेले. त्यांनी शाहू महाराजांना सर्व वृत्तान्त सांगितला. तेव्हा शाहू महाराज अण्णांना म्हणाले तुम्ही आता राजवाड्यावरती राहूनच शिक्षण घ्या. राजवाड्यावर राहून शाहू पुत्र राजाराम महाराज आणि प्रिन्स शिवाजी यांच्या सोबत आण्णा शिकले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या छत्रछायेखाली कर्मवीर अण्णांचे शिक्षण झाले. आण्णा सहावीत नापास झाले, पण डगमगले नाहीत, निराश झाले नाहीत. ते हिम्मतवान होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज त्यांचे शिक्षक भार्गव कुलकर्णी यांना म्हणाले भाऊ पाटलाला मार्क कमी आहेत, परंतु तो अत्यंत गुणवान आहे, त्याला वरच्या वर्गात पाठवा त्यावेळेस कुलकर्णी मास्तर म्हणाले महाराज, भाऊ पाटील ज्या बेंचवर बसतो ती बेंच वरच्या वर्गात पाठवेन, परंतु भाऊ पाटलाला वरच्या वर्गात पाठवणार नाही. ज्या कर्मवीर भाऊराव पाटील यांना सहावा वर्ग उत्तीर्ण होता आला नाही, त्या कर्मवीर भाऊराव पाटलांनी कोट्यावधी मुलांना शिक्षण दिले. आज त्यांचे विद्यार्थी जगातील विविध क्षेत्रांमध्ये आहेत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांना गरीबाप्रति खूप तळमळ होती. गरिबांना शिकविण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले, पण बहुजन मुलांना उपाशी राहू दिले नाही किंवा त्यांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. गावोगावी जाऊन त्यांनी मुलं आणून त्यांना मोफत शिक्षण दिले. आण्णा महाराष्ट्राची मायमाऊली आहेत.

आण्णा प्रचंड महत्त्वाकांक्षी होते. 'नाही' हा शब्द आण्णांच्या जीवनकोशात नव्हता. संकटावर मात करण्याचं सामर्थ्य आण्णामध्ये होते. एकदा आण्णा सातारा येथील डेप्युटी कलेक्टर यांना भेटायला गेले होते. डेप्युटी कलेक्टर आण्णांना म्हणाले माझ्या मुलीला संस्कृत शिकवनार का? आण्णा म्हणाले हो, शिकवणार नंतर आण्णांच्या लक्षात आले की आपल्याला संस्कृत येत नाही. आपण तर संस्कृत शिकविण्याचा शब्द दिलेला आहे. आण्णांनी स्वतः संस्कृत क्लास लावला. ते एका शिक्षकाकडे सकाळी लवकर संस्कृत शिकायला जायचे आणि त्यानंतर डेप्युटी कलेक्टरच्या मुलीला संस्कृत शिकवायचे. आणा प्रचंड प्रयत्नवादी होते. त्यांनी कधीही नकारघंटा वाजवली नाही. आण्णांनी विचारधारेशी कधीही तडजोड केली नाही. ते शेकापशी एकनिष्ठ होते. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी रयत शिक्षण संस्थेची ग्रँट बंद केली म्हणून त्यांनी पक्षांतर केले नाही किंवा ते साधे भेटायलाही गेले नाहीत. त्याच्याविरुद्ध लढत राहिले, इतके ते स्वाभिमानी होते. आण्णा जितके कनवाळू होते तितकेच ते बाणेदार होते. गाडगेबाबा बाळासाहेब खेर यांना भेटले आणि त्यानंतर रयत शिक्षण संस्थेचे अनुदान सुरु झाले. अण्णा आर्थिक अडचणीत असताना एक व्यापारी आण्णांना म्हणाला मी तुम्हाला पैसे देतो, पण तुम्ही कॉलेजला दिलेले शिवाजीराजांचे नाव बदला आणि माझे नाव कॉलेजला द्या तेंव्हा आण्णा म्हणाले एक वेळेस जन्मदात्या बापाचे नाव बदलेण, पण एकदा कॉलेजला दिलेले शिवाजीराजांचे नाव मी कधीही बदलणार नाही पैशासाठी त्यांनी कधीही निष्ठा किंवा तत्व बदलली नाहीत. आण्णा हे महान शिवप्रेमी होते, पण त्यांनी शिवाजीराजांचे नाव घेऊन तरुणांच्या डोक्यात द्वेष आणि हातात दगड–धोंडे किंवा तलवारी दिल्या नाहीत, तर त्यांच्या हातात पाटी–पुस्तक आणि लेखणी दिली. त्यांनी लाखो विद्यार्थी घडविले. आज जगभर विविध क्षेत्रात रयतचे विद्यार्थी आहेत. कर्मवीर आण्णांनी शिवरायांचे नाव घेऊन शाळा काढल्या. जाती–जातीत धर्मा–धर्मात त्यांनी प्रेम आणि आपुलकीची भावना निर्माण केली. तरुणांना डॉक्टर, वकील, इंजिनिअर, न्यायाधीश, उद्योजक बनविले. त्यामुळे आज तरुणांना कर्मवीर पाटील गुरुजींची गरज आहे. आण्णा हे महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते होते.१९०६ सालचे सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्योधाराबाबतचे भाषण वाचून अण्णांच्या मनात उपेक्षित वर्गाबाबत प्रचंड तळमळ निर्माण झाली. शाहूराजांच्या छत्रछायेखाली त्यांचे शिक्षण झाले. कर्मवीर भाऊराव आण्णांनी सत्यशोधकी विचारांसाठी मरण पत्करले, परंतु सनातनी विचारधारेला ते कधीही शरण गेले नाहीत, बाळासाहेब खेर या सनातनी मुख्यमंत्र्यांनी कर्मवीर आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेची ग्रँट बंद केली, तरी आण्णा त्या सनातनी विचारधारेला शरण गेले नाहीत. शेवटपर्यंत पुरोगामीवृत्ती आणि तत्त्वनिष्ठा त्यांनी सोडली नाही. ते नीतिमान, निस्वार्थी, निष्कलंक, निर्भय, निर्व्यसनी, निपक्षपाती होते. त्यांनी डोंगरदऱ्यात, दुष्काळी भागात शाळा काढल्या.अनेक जमीनदारांनी,सरदारांनी, शेतकऱ्यांनी त्यांना मोठ्या मनाने देणग्या दिल्या. सातारच्या छत्रपतीनी संस्थेसाठी जमीन दिली. घेणारे हात स्वच्छ असतील तर देणारे लाखो हात पुढे येतात. आण्णा स्वछ मनाचे आणि वृत्तीचे होते.

कमवा आणि शिका, स्वावलंबी शिक्षण हे आण्णांचे धोरण होते. मन, मनगट आणि मेंदू सक्षम करणारे शिक्षण असावे, हा त्यांचा आग्रह होता. विद्यार्थ्यांबरोबर आण्णा काम करायचे, विद्यार्थ्यांबरोबर पंक्तीला जेवायचे, विद्यार्थी आजारी पडला तर आण्णा स्वतः रात्रभर जागून विद्यार्थ्याची सेवा करायचे. आण्णा म्हणजे विद्यार्थ्यांची जणू आईच होती. कर्मवीर अण्णांच्या या अद्वितीय कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने आणि पुणे विद्यापीठाने डी.लिट. पदवी देऊन सन्मानित केले. अशा या शैक्षणिक क्षेत्रातील संतांचा ९ मे १९५९ रोजी मृत्यू झाला. आण्णांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या राज्य–परराज्यात आज सुमारे ६५० शाखा आहेत. आशिया खंडातील अत्यंत दर्जेदार शिक्षण संस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेचा लौकिक आहे. अत्यंत तळमळीने काम करणारे शिक्षक या संस्थेत आहेत. या संस्थेत भरती करताना आजही वशिला किंवा पैसा चालत नाही, तर गुणवत्ता पाहिली जाते. कर्मवीर भाऊराव पाटील या शैक्षणिक क्षेत्रातील संततुल्य शिक्षणमहर्षीना स्मृतिदिनामित्त विनम्र अभिवादन!



लेखक
**डॉ.श्रीमंत कोकाटे**

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडेंवर शाईफेक

**“निर्जनस्थळी अडवून शाईच्या बाटल्या ओतल्या” – विकास लवांडे** | **पिस्तुलाचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी असल्याचा आरोप** | **आळंदीहून पुण्याकडे परतत असताना गाडी अडवून हल्ला** | **राज्याच्या राजकारणात खळबळ**



### पोलिसांकडून तपास सुरू

लोणीकाळभोर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, सीसीटीव्ही फुटेज, व्हिडीओ क्लिप आणि प्रत्यक्षदर्शींच्या आधारे तपास सुरु करण्यात आला आहे. हल्लेखोरांची ओळख पटवून लवकरच कारवाई केली जाईल, असे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

### हल्लेखोरांना कुणाचा वरदहस्त?– सुप्रिया सुळे

खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेवर संताप व्यक्त करत सरकारवर निशाणा साधला.भररस्त्यात एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याला अडवून त्याच्यावर हल्ला करण्याचे धाडस करणाऱ्यांना कुणाचा वरदहस्त आहे हे उघड आहे. कायदा–सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही गंभीर बाब आहे, असे त्या म्हणाल्या.

### ज्ञानोबा–तुकोबांनाही अशाच वृत्तीने छळले – रोहित पवार

या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. वारकरी संप्रदायात घुसखोरी केलेल्या कट्टरतावाद्यांविरोधात विकास लवांडे पुराव्यांसह आवाज उठवत होते. त्याचाच राग मनात धरून त्यांच्यावर भ्याड हल्ला करण्यात आला. ज्ञानोबा–तुकोबांनाही मनुवादी वृत्तीने असेच छळले होते. या हल्लेखोरांवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### हिंस्र मनुवादी प्रवृत्तींचा काळा चेहरा – विजय वडेट्टीवार

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या हल्ल्याचा निषेध करत म्हटले की, संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत अशा प्रकारची हिंसक घटना घडणे दुर्दैवी आहे. हा हल्ला म्हणजे हिंस्र मनुवादी प्रवृत्तींना असलेल्या सत्तेच्या पाठबळाचे प्रतीक आहे.

पिस्तुलासारखी हत्यारे होती आणि त्यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप लवांडे यांनी केला आहे.घटनेनंतर लवांडे यांनी तत्काळ लोणीकाळभोर पोलीस ठाण्यात धाव घेत संग्राम भंडारे व त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. हल्लेखोरांवर कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत पोलिस स्टेशन सोडणार नाही, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली.



घटनेनंतर जारी केलेल्या व्हिडीओमध्ये विकास लवांडे यांनी संपूर्ण घटनाक्रम कथन केला.आज सकाळी आळंदी येथे माझे प्रवचन होते. कार्यक्रम संपल्यानंतर मी पुण्याकडे निघालो असताना संग्राम भंडारे आणि त्यांच्या समर्थकांनी माझा पाठलाग केला. निर्जनस्थळी गाडी अडवून मला खाली उतरवण्यात आले. माझ्या अंगावर शाईच्या बाटल्या ओतण्यात आल्या. मला धक्काबुक्की करण्यात आली. त्यातील दोघांकडे बंदुका होत्या आणि ते मला जीवे मारण्याची धमकी देत होते, असा आरोप त्यांनी केला. नेमका वाद काय? राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी एका लेखातून वारकरी संप्रदायात प्रतिगामी आणि धर्मांध विचारांच्या लोकांची घुसखोरी झाल्याचा आरोप केला होता. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीत कट्टर विचार वाढत आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले होते.या पार्श्वभूमीवर विकास लवांडे यांनी कथित घुसखोर म्हणून काही प्रवचनकार व कीर्तनकारांची नावे जाहीर करत एक यादी प्रसिद्ध केली होती. त्यात काही प्रसिद्ध वारकरी प्रवचनकारांचाही समावेश होता. यानंतर राज्यभरात मोठा वाद निर्माण झाला होता. वारकरी संप्रदायातील अनेकांनी या भूमिकेला तीव्र विरोध दर्शविला होता.

# शासन आपल्या दारी नव्हे, आता थेट गावपातळीवर!

## आष्टी मंडळात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत आष्टी मंडळामध्ये भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट नागरिकांच्या दारी पोहोचविण्यात आला.

या अभियानात श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, ई–शिधापत्रिका आदेश, बेबी केअर किट वितरण, नगरपंचायत अंतर्गत बांधकाम परवाने, आयुष्यमान कार्ड, जन्म प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र, डिजिटल सातबारा वितरण, रस्ता खुला बाबत सातबारावर नोंद घेणे अशा विविध सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला.विशेष म्हणजे भटक्या–विमुक्त जमातीतील मौजे ब्रह्मगाव व मौजे मांडवा येथील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शासनाच्या योजनांपासून कोणताही घटक वंचित राहू नये, या उद्देशाने प्रशासनाने गावपातळीवर थेट जनतेशी संवाद साधत सेवा उपलब्ध करून दिल्या.



# भोंदू अशोक खरात प्रकरण:रुपाली चाकणकरांची एसआयटीकडून ६ तास चौकशी

## आर्थिक व्यवहार आणि पूजा-विधींबाबत विचारले प्रश्न

नाशिक। प्रतिनिधी

राज्याला हादरवून सोडणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता राजकीय धागेदोरे अधिक घट्ट होताना दिसत आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (डखढ) आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्री रूपाली चाकणकर यांची तब्बल ६ तास कसून चौकशी केली. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी स्वतः दोन तास चाकणकरांना प्रश्नांच्या फेऱ्यात पकडले होते.

अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकर यांचे नाव चर्चेत आल्यापासून त्यांना एसआयटी नोटीस बजावणार असल्याची चर्चा होती. सुरुवातीला आपल्याला कोणतीही नोटीस मिळाली नसल्याचे सांगणाऱ्या चाकणकर आज अखेर नाशिक येथे एसआयटी चौकशीला सामोरे गेल्या. सकाळी सुरू झालेली ही चौकशी सायंकाळपर्यंत सुरू होती. यापूर्वी चाकणकर यांच्या बहिणीचीही एका पतसंस्थेतील आर्थिक व्यवहाराप्रकरणी चौकशी झाली होती, त्या पार्श्वभूमीवर आजची चौकशी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, एसआयटीने चाकणकर यांच्यावर प्रश्नांची मोठी सरबत्ती केली. अशोक खरातसोबत तुमचे नेमके कधीपासून संबंध होते? खरातसोबत केलेले पूजा-विधी नेमके कोणते होते आणि त्यामागे काही आर्थिक व्यवहार दडले होते का? 'शिवनिका' संस्थेच्या बैठकींमध्ये नेमके काय कामकाज चालायचे? त्यावेळेस खरातच्या गैरप्रकारांची तुम्हाला माहिती होती का? खरातच्या मंदिरात येणारे इतर राजकीय नेते कोणाच्या सांगण्यावरून येत होते? खरातसोबतचे फोटो आणि व्हिडिओ नेमके कोणत्या कार्यक्रमातील आणि कधीचे आहेत? असे प्रश्न रूपाली चाकणकरांना विचारण्यात आले.

एसआयटी पथकाकडून चौकशी संपल्यानंतर बाहेर पडताच रूपाली चाकणकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, तपास यंत्रणेला जे काही आवश्यक होते, त्यात मी पूर्ण सहकार्य केले आहे. मी एसआयटीच्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली असून माझी बाजू सविस्तरपणे मांडली आहे. या चौकशीचा अहवाल लवकरच तुमच्यापर्यंत येईल. अधिक भाष्य करणे टाळत त्या तात्काळ पुण्याच्या दिशेने रवाना झाल्या.यापूर्वी एसआयटीने रूपाली चाकणकर यांच्या बहिणीचीही चौकशी केली होती. एका पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात ही चौकशी झाली होती. अशोक खरातच्या पोलीस कोठडीत वारंवार वाढ होत असताना, आता उच्चपदस्थ राजकीय व्यक्तींची चौकशी सुरू झाल्याने या प्रकरणाला मोठे वळण मिळाले आहे.मुख्य आरोपी अशोक खरातसोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांच्यावर विरोधकांनी गंभीर आरोप केले होते. चाकणकर या खरातला आपला 'गुरू' मानत असल्याने त्यांनी यापूर्वीच्या काही प्रकरणांत राजकीय हस्तक्षेप केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची आक्रमक मागणी लावून धरली होती.वाढत्या राजकीय दबावामुळे चाकणकर यांनी अखेर राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आजची ही चौकशी या प्रकरणातील पुढील दिशा ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# सदफ शेख हिचा सत्कार

## राजेंद्र घोडके यांनी स्वीकारले पुढील शिक्षणाचे पालकत्व



अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात शिक्षणाला प्रोत्साहन देणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा एक प्रेरणादायी उपक्रम समोर आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, या उदात्त भावनेतून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सार्वजनिक बांधकाम विभागातून सेवानिवृत्त झालेले राजेंद्र घोडके यांनी कौतुकास्पद निर्णय घेत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.गांधीनगर येथील सदफ शेख हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल ८९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. फातिमा उर्दू माध्यमिक शाळा येथील विद्यार्थिनी असलेल्या सदफने शाळेत प्रथम क्रमांक पटकावत आपल्या कुटुंबासह शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

सदफच्या या यशाबद्दल राजेंद्र घोडके यांनी तिचा तसेच तिच्या आई-वडिलांचा विशेष सत्कार करून गौरव केला. यावेळी बोलताना त्यांनी सदफच्या पुढील शिक्षणाचा संपूर्ण खर्च स्वतः उचलण्याची घोषणा केली. उच्च शिक्षणासाठी तिचे पालकत्व स्वीकारत त्यांनी शिक्षणाला प्रोत्साहन देणारा समाजापुढे एक सकारात्मक आदर्श ठेवला आहे.या निर्णयामुळे शेख कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदफ शेख हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांसह शिक्षकांना दिले. तसेच राजेंद्र घोडके यांच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांचा मिळालेला आधार आपल्यासाठी प्रेरणादायी असल्याची भावना तिने व्यक्त केली.विशेष म्हणजे, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये या भावनेतून राजेंद्र घोडके सातत्याने सामाजिक कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे.सदफ शेख हिच्या उज्ज्वल भविष्यासाठी नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचा ७ व्या सत्राचा निकाल १०० टक्के

## यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सन्मान

बीड। प्रतिनिधी

शहरातील आदित्य नर्सिंग महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणक्ड), नाशिकच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा सातव्या सत्राचा निकाल तब्बल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत यश मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सन्मान करण्यात आला.

> महाविद्यालयाचा सातव्या सेमिस्टरचा निकाल १०० टक्के लागणे ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांनी शिस्त आणि समर्पणाच्या जोरावर हे यश मिळवले. भविष्यात हे विद्यार्थी उत्कृष्ट परिचारिका बनून समाजसेवा करतील, असा विश्वास वाटतो.
> -डॉ. आदिती सारडा (संचालिका, आदित्य शिक्षण संस्था, बीड

या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे अभिनंदन केले. विद्यापीठाने जाहीर केलेल्या निकालात आदित्य नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी सर्वच सत्रांत आपला दबदबा निर्माण केला आहे. सातव्या सत्रात प्रदिप गोकुळ भांगे याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय रचना दिपक अवसरमोल, तृतीय सुरज शाहु घुले. ६ व्या सत्रामध्ये प्रथम क्रमांक साक्षी माने, द्वितीय प्रथमेश निकाळजे, तृतीय आंचल थाटे इतर विद्यार्थ्यांनीही उच्चांकी गुण मिळवत यश प्राप्त केले आहे. यशस्वी विद्यार्थिनी रचना अवसरमोल हिने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाले. नर्सिंग हे केवळ शिक्षण नसून सेवा आणि समर्पणाची भावना आहे, हे आम्हाला येथे शिकायला मिळाले.

# बर्दापूर येथे शेतात भीषण आग; शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर परिसरातील लिबगाव रोडवरील गट नंबर ५७८ मधील शेतात दिनांक १० रोजी दुपारी विद्यूत तारेचे घरशन होवून स्पार्किंग होवून भीषण आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या आगीत शेतकरी संतोष सत्यनारायण बजाज यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून जनावरांच्या चार्यासह पाईपलाईन, झाडे व इतर साहित्य जळून खाक झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतातून एलटी वीजवाहिनी गेलेली असून तिच्या तारा सैल झाल्याने दोन्ही तारा एकमेकांवर आदळल्या. त्यातून ठिणगी पडून अचानक भीषण आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले होते.या घटनेत जनावरांसाठी साठवून ठेवलेला चारा पूर्णपणे जळून गेला असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. आता मी संकटात सापडलो आहे, जनावरांना काय खाऊ घालू? अशी हळहळ व्यक्त करत संतोष बजाज यांनी आपली व्यथा मांडली. आग इतकी भीषण होती की पाईपलाईन, झाडे तसेच इतर शेती उपयोगी साहित्याचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. या दुर्घटनेमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. संबंधित प्रशासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण हिसकावणारी टोळी सक्रिय

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरासह आष्टी-कडा महामार्ग परिसरात गेल्या काही दिवसांपासून धूम स्टाईल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. विशेषतः महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याचे गंठण व दागिने हिसकावून दुचाकीवरून पसार होणाऱ्या अज्ञात चोरट्यांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. भरदिवसा घडणाऱ्या या घटनांमुळे महिला वर्गामध्ये प्रचंड असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पाच दिवसांपासून आष्टी शहरातील प्रमुख रस्ते, गर्दीचे भाग तसेच आष्टी-कडा महामार्गावर महिलांना लक्ष्य केले जात आहे. दोन अज्ञात इसम दुचाकीवर येतात, क्षणार्धात महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून भरधाव वेगाने पसार होतात. या घटनांमध्ये काही महिलांना दुखापत झाल्याच्याही चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत. विशेष बाब म्हणजे, या घटना सातत्याने घडत असतानाही पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होताना दिसत नाही. सीसीटीव्ही तपास, संशयितांची धरपकड अथवा रात्रीच्या गस्तीत वाढ यासारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

# बीड जिल्हयातुन १५९९ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड/प्रतिनिधी

आज दिनांक ९ मे २०२६ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचेउद्घाटन आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर उदघाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ व्ही.एच.पाटवदकर, जिल्हा न्यायाधीश-२ एस.आर.शिंदे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर.एम नेरलीकर मुख्य न्यायदंडाधिकारी पी.आर.शिंदे व इतर न्यायिक अधिकारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एस.जी.पिसुरे, उपाध्यक्ष आर.व्ही. देशमुख, सचिव सुभाष काळे तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ सदर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरूनआनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ९ मे २०२६ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण. १२०९ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११३५३ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय. अॅक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ३७१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण २१११५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८३८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तसेच स्पेशल डाईव्हचे एकूण प्रलंबीत प्रकरणापैकी ३९० प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण १५९९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये ७ कोटी ४२ लाख ५९ हजार ३३९ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.बीड मुख्यालयातून कौटुंबिक न्यायालयातील एकूण ५ प्रकरणे निकाली निघाली असून यामध्ये पाच महिला सासरी नांदावयास जाणेची प्रकरणे यशस्वी झाली आहेत. तसेच मोटार अपघात प्रकरणात एका प्रकरणामध्ये ४ कोटी ४८ लाख ९० ची प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी डॉ.वहाब ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता तसेच जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक एस.पी.झेंड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.टी. शिंदे व इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी वर्ग यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश; मागणी मान्य

परळी / प्रतिनिधी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकलेली ऊस बिलाची रक्कम, तोडणी मजुरी, वाहतूक व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे याबाबत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने ओंकार शुगर्स समोर सुरू केलेल्या सत्याग्रह आंदोलनास दुसऱ्या दिवशी रात्री उशिरा सुरूच होते शेवटी शेतकऱ्यांनी आक्रमक होत कारखान्याच्या गाड्या अडवायला सुरुवात केली असता कारखाना प्रशासनाने शेतकरी एकजुटी पुढे नमती भूमिका घेत १५ दिवसात सर्व ऊस देयक अदा करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने संघर्ष समितीने हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे समिती मार्फत सांगण्यात आले. पांगरी, लिंबुटा, टाकळी व कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांची एकजुट यामुळे दिलेल्या लढ्याला यश मिळाल आहे.



सत्याग्रह आंदोलनाची धास्ती घेत कारखाना प्रशासनानं १८००/प्रति टन प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरुवात केलेली आहे. जाहीर केलेल्या २९५०/- प्रति टन दराप्रमाणे उर्वरीत ११५०/प्रति टन रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात दि.२५ मे पर्यंत जमा करण्याचं लेखी अभिवचन कारखाना प्रशासनाकडून जनरल मॅनेजर एस.व्ही सोळंके यांनी शनिवारी रात्री उशिरा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना दिलं आहे. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे नेते ड. अजय बुरांडे, ड.श्रीनिवास मुंडे, श्रीराम बडे, विनायकराव मुंडे, अरुण महाराज शिंदे, देविदास कराड, धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उपस्थित होते. या आंदोलनाची धास्ती घेऊन छड्ड पवारवाडी व ट्वेंटी २० सायखेडा या दोन्ही कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या खात्यात जाहीर केलेल्या दराप्रमाणे ऊस बिल रक्कम जमा जमा करण्यास सुरुवात झालेली आहे. तसं या कारखान्यांनी शेतकरी संघर्ष समिती ला कळवलं आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काचे घामाचे पैसे मिळवण्यासाठी आंदोलन करावं लागतंय हीच मुळात मोठी शोकांतिका आहे. बळीराजा न ऊन वारा पाऊस, सुलतानी अस्मानी संकटाशी सामना करत रात्र रात्र जागून पिकविलेल्या पिकाचा मोबदला मिळवण्यासाठी एवढा अट्टाहास आणि लढा कराव लागतंय हे दुर्दैवी आहे. इथून पुढच्या काळात सुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी शेतकऱ्याच्या एकजुटीची वज्रमूठ अशीच राहू द्या. असे आवाहन शेतकरी संघर्ष समितीने केलं आहे.

# राज्यात कायद्याचा वचक राहिला नाही!

## मुख्यमंत्र्यांनी गृहखाते दुसऱ्याकडे सोपवावे

## वाढत्या गुन्हेगारीमुळे राज्याची प्रतिमा मलीन

## "गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यात सरकार अपयशी"

## खासदार बजरंग सोनवणे यांचा सरकारवर घणाघात

बीड। प्रतिनिधी

राज्यात वाढत्या गुन्हेगारीमुळे कायद्याचा धाक संपुष्टात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवलेले गृहखाते दुसऱ्याकडे सोपवावे, अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे. राज्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होत असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला.बजरंग सोनवणे म्हणाले की, देशातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मुंबईचा पहिला क्रमांक लागणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची नव्हे तर चिंतेची बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवली आहेत. त्यामुळे गृहखात्याकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. मुख्यमंत्री असताना गृहखाते दुसऱ्या सक्षम व्यक्तीकडे दिले पाहिजे होते. राज्यात आज कायद्याचा वचक उरलेला नाही.

### विकास लवांडेंवरील शाईफेक अशोभनीय आणि भ्याड

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर झालेल्या शाईफेक प्रकरणाचाही सोनवणे यांनी तीव्र निषेध केला.साधू-संतांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना होणे अत्यंत अशोभनीय आहे. विचारांना विचारांनी उत्तर दिले पाहिजे. अशा प्रकारे भ्याड हल्ले करणे चुकीचे आहे. वारकरी संप्रदायाच्या संस्कृतीला न शोभणारी ही घटना आहे, असे ते म्हणाले.

### सरकारविरोधात विरोधक आक्रमक

राज्यातील वाढती गुन्हेगारी, अशोक खरात प्रकरण आणि राजकीय कार्यकर्त्यांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर विरोधक अधिक आक्रमक झाले असून, आगामी काळात कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून राज्य सरकारला घेरण्याची रणनीती आखली जात असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.



राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालल्याचा आरोप करत सोनवणे यांनी सरकारवर थेट हल्लाबोल केला. महिला अत्याचार, खून, फसवणूक, टोळीयुद्ध आणि राजकीय हिंसाचाराच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री आणि गृहमंत्री ही दोन्ही जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळणे शक्य होत नसल्याचे चित्र राज्यात दिसत आहे. गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती राहिलेली नाही. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.अशोक खरात प्रकरणावर बोलताना बजरंग सोनवणे यांनी सांगितले की, या प्रकरणात अनेक महिलांनी अत्याचाराच्या तक्रारी दिल्या असून, जवळपास १३ ते १४ तक्रारी समोर आल्या आहेत. या गंभीर आरोपांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी स्थापन करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणात खरात यांच्या पत्नीचा शोध सुरू असून त्यांच्या मुलालाही अटक करण्यात आली आहे. कुटुंबातील इतर सदस्यांचा सहभाग आहे की नाही, हे तपासातून स्पष्ट होईल. तपास यंत्रणा आपले काम करत आहे. त्यामुळे सध्या अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना चौकशीसाठी बोलावण्यात आल्याच्या मुद्द्यावरही भाष्य केले. जर काही त्रुटी किंवा चुका असतील तर त्या चौकशीतून समोर येतील, असे ते म्हणाले.

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई: केज येथील टेम्पो चोरीचा गुन्हा २४ तासांत उघड

बीड: प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) धडाकेबाज कामगिरी करत केज परिसरातून चोरीला गेलेला आयशर टेम्पो अवघ्या एका दिवसात शोधून काढला आहे. या प्रकरणी दोन सराईत चोरट्यांना जेरबंद करण्यात आले असून, चोरीचा टेम्पो जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

केज येथील रहिवासी नसीर कुरेशी यांनी ५ मे २०२६ रोजी आपला आयशर टेम्पो (क्रमांक चक-१५-ऊप्त-४२४१) घरामागील मोकळ्या जागेत लावला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी टेम्पो त्या ठिकाणी दिसून न आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन केज येथे तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता.





गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला तपासाचे आदेश दिले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, दोन इसम टेम्पो चोरी करताना दिसून आले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी उमरे ऊर्फ पाप्या मुस्ताक फारुकी (रा. रोजा मोहल्ला, केज) आणि आवेश ऊर्फ आवड्या खाँजा शेख (रा. कोकीजपरी, केज) यांना ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच दोन्ही आरोपींनी चोरीची कबुली दिली. चोरी केलेला टेम्पो त्यांनी धारूर येथील एम.आय.डी.सी परिसरात लपवून ठेवला होता. पोलिसांनी तो टेम्पो जप्त केला असून दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. हे दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वीही चोरी आणि जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक आणि अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, बप्पासाहेब घोडके, जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या तत्पर कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

# स्वाती ज्ञानेश्वर महानोरचे दहावी परीक्षेत यश



बीड / प्रतिनिधी: गेवराई तालुक्यातील शेकटा येथील राजमाता जिजाउ माध्यमिक विद्यालयात शिकत असलेल्या स्वाती ज्ञानेश्वर महानोर या शेतकऱ्याच्या मुलीने दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये एकही मार्कची कॉपी न करता ७८.६० टक्के मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दि. ८ मे रोजी जाहीर करण्यात आला असून गेवराई तालुक्यातील राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८८.८ टक्के लागला आहे. यामध्ये स्वाती ज्ञानेश्वर महानोर या विद्यार्थिनीने ७८.६० टक्के मिळवून शाळमधून तिसरा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. स्वाती महानोर ने शाळा संपल्यानंतर शेतात काम करून परीक्षेमध्ये एकही मार्कची कॉपी न करता हे यश संपादन केल्याल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक व गावातील प्रतिष्ठीत नागरिकांकडून तिचे कौतूक केले जात आहे.

# योगेश्वरीच्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचा समारोप

अंबाजोगाई। प्रतिनिधी

योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला आत्मभान शिबीराच्या समारोप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे होत्या

व्यासपीठावर उपाध्यक्ष जी.बी. व्यास,डॉ.जे.बी. मोटेगांवकर,ॲड. के.जे. विर्धे,प्राचार्य डॉ.पी.एस. देशमुख,विद्यालय विभाग प्रमुख योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे पदाधिकारी,सदस्य उपस्थित होते.





यावेळी बोलताना अश्विनी सोनवणे म्हणाल्या की,महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिर उपयुक्त असून मुलींमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद मिळावी,स्वसंरक्षण करता यावे यासाठी शिबीरे गरजेचे आहेत. बदलत्या जीवन शैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ न देता ती उर्जा निर्माण करून समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी विद्यार्थिनींनी पुढाकार घ्यावा असेही त्या म्हणाल्या. शिबिराबाबत आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात चौसाळकर म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्था घेत असलेले महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीर मुलींसाठी महत्वाचे असून यामुळे शारिरीक क्षमता वृद्धींगत होते.शिबीरात झालेल्या विविध क्रिडा प्रकारांचा विद्यार्थिनींनी सराव वर्षभर करावा म्हणजे त्याचा उपयोग भावी काळात होईल. शिबीरार्थी मुलींनी योगासने,काठी-लाठी, तलवारबाजी,कराटे इत्यादी वेगवेगळे प्रात्यक्षिके करून दाखवले. उपस्थित पाहुण्यांचे तसेच शिबीरातील विविध प्रशिक्षक,योगशिक्षक यांचे स्वागत संस्थेच्या वतीने करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.पी.एस. देशमुख यांनी केले.तर डॉ.रशिदा शेख यांनी संचालन केले.यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक,विविध विभागाचे प्रमुख,शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते.

# कल्याण-विशाखापट्टणम हायवे (NH-61) अपघाताचा हॉटस्पॉट!

## जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात!

मादळमोही /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातुन जाणारा कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग ६१ (छक-६१) वरील पाथर्डी ते पाडळशिंगी दरम्यान सुरू असलेले काम सध्या प्रवाशांसाठी जीवघेणे ठरत आहे.विशेष म्हणजे कोळगाव ते तांदळा या दरम्यान दोन ठिकाणे हे अपघाताचे हॉटस्पॉट ठरत आहेत .वारंवार होणारे अपघात आणि रस्ते बांधणीतील तांत्रिक त्रुटींमुळे हा हायवे आता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे की काय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.अनेक वेळा अपघात होवुन ही प्रशासन देखल देत नाही, त्यामुळे या महामार्गावरून प्रवास करणे म्हणजे थरारक झाले आहे,जिल्हा प्रशासनास लेखी निवेदन देवुन ही दखल दिली जात नसल्याचे खंत सामाजिक कार्यकर्ते ,पत्रकार ओंकार शेंबडे व्यक्त केली आहे काल रात्री झालेल्या मोटारसायकल व कंटेनर अपघातात शिरुर कासार तालुक्यातील निमगाव मायंबा येथिल दाम्पत्य जागीच ठार झाले आहे, त्यामुळे हा राष्ट्रीय महामार्ग अपघातचा हॉटस्पॉट झाल्याचे







### अपघात दाम्पत्य जागीच ठार

शिरुर कासार तालुक्यातील निमगाव मायंबा येथिल दाम्पत्य बाबु रामभाऊ बळे वय ५८ वर्ष त्यांची पत्नी सौ,मंगल बाबु बळे वय ५४ वर्ष हे मोटारसायकल क्रमांक एम एच १४,सी झेड ७२०९ हीस कंटेनर एम एच ४२ बी एफ ७७९० याने फरफटत नहलेने दोघे जागीच ठार झाले आहेत, घटनास्थळी पंचनामा पोलिस चौकीचे जमादार राम बरगजे यांनी केला या अपघाता बाबत जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात आणि या 'मृत्यूच्या सापळ्या'तून प्रवाशांची सुटका कधी होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

स्पष्ट झाले आहे, या प्रकरणी ओमकार शेंबडे यांनी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, या महामार्गाचे काम टी.एन.टी. इन्फ्रास्ट्रक्चर (पुणे) या कंपनीकडे आहे. रस्ते बांधणीच्या नियमांनुसार रस्त्याच्या कडेला असलेला 'साईड पंखा' (Shoulder) २.५ मीटर असणे आवश्यक आहे. मात्र, या ठिकाणी तो केवळ १.५ मीटर भरला असून त्यातही मुरमाऐवजी मोठमोठाले दगड वापरण्यात आल्याचे दिसून येत आहे. यामुळे वाहन रस्त्याच्या खाली उतरल्यास भीषण अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. संबंधित कंपनीचे अधिकारी साईटवर उपलब्ध नसतात आणि फोन केल्यास उडवाउडवीची उत्तरे देतात, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कामाच्या ठिकाणी आवश्यक बॅरिकेड्स किंवा सूचना फलक नसल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. विशेष म्हणजे, पाडळशिंगी जवळ नुकताच तयार झालेला रस्ता दोन ते तीन इंच खचल्याचे धक्कादायक वास्तव आले आहे.

> आम्ही वारंवार निवेदन देऊनही जिल्हा प्रशासन ढिम्म आहे. हायवेचे काम निकृष्ट दर्जाचे असून अपघात वाढले आहेत. जर तातडीने सुधारणा झाली नाही आणि संबंधित कंपनीवर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> – ओमकार शेंबडे

जिल्हाधिकाऱ्यांना विचारले गेलेले महत्त्वाचे प्रश्न: पत्रकार ओमकार शेंबडे यांनी २० एप्रिल रोजी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनानंतर आता काही गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत: कारवाई कधी होणार?: निकृष्ट काम करणाऱ्या टी.एन.टी. इन्फ्रास्ट्रक्चर पुणे या कंपनीवर प्रशासन दंडात्मक किंवा कायदेशीर कारवाई करणार का? गुन्हा दाखल होणार का?: सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करून लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल होणार का? मदत आणि भरपाई: या मार्गावर झालेल्या अपघातातील मृतांच्या वारसांना आणि जखमींना आर्थिक मदत मिळणार का? निवेदनाचे काय झाले?: २० एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनावर जिल्हाधिकारी कार्यालयाने आतापर्यंत कोणती पावले उचलली आहेत?

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ माळीवेस ,बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड - ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. कार्यकारी संपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२

This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID– skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Executive Division Appasaheb Mahanor, Mo-9511712592